विषय:- जिल्हा परिषद वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी यांच्याविरूध्द खातेनिहाय चौकशीबाबत.

सातारा जिल्हा परिषद, सातारा
सामान्य प्रशासन विभाग,
जा.क्र.साप्रवि/आस्था-२(२)/६६०क/२०१९
दिनांक०४/१०/२०१९

वाचा:-
१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम ९५ व ९६
२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील), नियम १९६४ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक), नियम १९६७
३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१
४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीडीआर-१००९/प्र.क्र.५०/०९/११, दिनांक १३ मे,२०१०
५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, विभाग शासन निर्णय क्रमांक निप्रआ-१११/प्र.क्र.८६/ ११-अ,दि.१४.१०.२०११
६) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना दिनांक ०९ मे २०१३
७) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निप्रआ-१११८/प्र.क्र.११/११अ,दि. ०९ जुलै,२०१९

------------------------------

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे सातारा जिल्हा परिषद अंतर्गत कार्यान्वित असणारे खाते प्रमुख/गट विकास अधिकारी/कार्यालयीन प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम ९५ व ९६ नुसार जिल्हा परिषदेकडील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापना विषयक सर्व कामकाजाबाबतचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील), नियम १९६४ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक), नियम १९६७ नुसार जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असणारे वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी यांनी कार्यालयीन कामकाजामध्ये अथवा फौजदारी स्वरूपाच्या कारवाईच्या अनुषंगाने झालेल्या/केलेल्या कारवाईबाबत संबंधित कर्मचारी यांच्याविरूध्द शिस्तंभगविषयक कारवाई करण्याबाबत निकष ठरवून दिलेले आहेत, सदर निकषानुसार संबंधित कर्मचारी यांच्याविरूध्द खाते अंतर्गत कारवाई करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ नुसार कर्मचारी/अधिकारी यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबत निकष ठरवून दिलेले असून सदर निकषानुसार कारवाई करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, विभाग शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर,२०११ मधील तरतुदीनुसार निलंबित कर्मचारी यांच्या पुन:स्थापनेबाबत अटी व शर्ती अधिन राहून कार्यवाही करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या असून निलंबित कर्मचारी यांच्या निलंबनास (फौजदारी केस व्यतिरिक्त) ६ महिने पुर्ण झाल्यानंतर त्याच्या प्रकरणांचा आढावा घेवून सक्षम प्राधिकारी, यांनी संबधित कर्मचारी यांना सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत यथानियम उचित कार्यवाही करावी, तसेच फौजदारी केस मधील निलंबित कर्मचारी यांच्या निलंबनाबाबत १ वर्ष कालावधी पुर्ण झालेनंतर प्रकरणाचा आढावा घेवून प्रकरण विभागीय निलंबन आढावा समितीपूढे सादर करण्याची कार्यवाही करावी. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना दिनांक ०९ मे, २०१३ नुसार ज्याठिकाणी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने ६ महिने अशा उल्लेख केलेला आहे त्याऐवजी ३ महिने असे वाचावे असे नमुद केलेले आहे. त्यामुळे फौजदारी केस व्यतिरिक्त निलंबित कर्मचारी यांचे निलंबनाबाबत प्रकरणांचा ३ महिन्यानंतर आढावा घ्यावा.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०९ जुलै,२०१९ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा(शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार निलंबित शासकीय सेवकांना ९० दिवसांच्या कालावधीत दोषारोप पत्र बजाविणेबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहे, त्यानुसार सातारा जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी यांच्याविरूध्द खातेनिहाय चौकशी अनुषंगाने कारवाई होत नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, सदरची बाब गंभीर

Scanned by CamScanner

स्वरूपाची असून कार्यालयीन कामकाजाचा भंग करणारी आहे, त्यामुळे यापुढे सातारा जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी यांच्याविरूध्द निलंबनाची कारवाई करतेवेळी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा (शिस्त व अपील), नियम १९६४ मधील तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यासाठी जोडपत्र एक ते चार सोबत सादर करणे आवश्यक राहिल, सदरबाबत विलंब अगर हलगर्जीपणा झाल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख व संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी (सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी) व संबधित कार्यासनाचे कर्मचारी (वरिष्ठ सहाय्यक/कनिष्ठ सहाय्यक) यांच्यावर निश्चित करून शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा
**#9422993333**
**ceozpstr@gmail.com**

प्रति,

१.खाते प्रमुख, सातारा जिल्हा परिषद (सर्व....) यांना पुढील कार्यवाहीसाठी..

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती(सर्व...) यांना पुढील कार्यवाहीसाठी..

३. सातारा जिल्हा परिषद अंतर्गत सर्व संबधित कार्यालय प्रमुख, यांना पुढील कार्यवाहीसाठी..

Scanned by CamScanner